# National Education Society's High School, Bhandup

## I & II Unit Test

**Date : 08.08.2018** **Sub : Marathi** **Marks : 20**
**Std. : X** **Time : 45 mins**
**Roll No.:____ Div.____**

---

प्र.१ पुढील उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.

एकदा मी पु.ल.देशपांडे यांच्याकडे काही एका निमित्ताने गेलो होतो. काम झाल्यावर मी निघण्याच्या बेतात होतो; तेवढयात सुनिताबाईंनी मला थांबवले व विचारले, "तुम्हाला शाल दिली तर चालेल काय ?"

मी एका पायावर 'हो' म्हटले. पु.ल. व सुनीताबाई यांनी मला शाल दयावी, हा मला मोठा गौरव वाटला. ती शाल मी माझ्या खोलीतल्या सुटकेसमध्ये ठेवून दिली. वापरली मात्र कधीच नाही.

पुढे वाईला विश्वकोशाचा अध्यक्ष म्हणून मी गेलो. तिथे नदीकाठच्या प्राज्ञ पाठशाळेच्या खोलीत मी राहत असे. खोलीच्या दक्षिणेकडील खिडक्या कृष्णा नदीच्या चिंचोळया प्रवाहावर होत्या. थंडीच्या दिवसात एक बाई माझ्या खिडकी खालील घाटाच्या छोटया तटावर तिचे छोटे मूल एका टोपलीत ठेवून मासे पकडण्याच्या उदयोगात होती. तिचे बाळ कडाक्याच्या थंडीने कुडकुडत रडत होते; पण आई तिकडे बघतही नव्हती. मात्र मला राहवले नाही. मी सुटकेस मधील 'पुलकित' शाल काढली पाचपन्नास रूपयांच्या नोटा काढल्या व त्या बाईला हाक मारली. खिडकीतून ते सर्व खाली दिले आणि म्हटले, "त्या बाळाला आधी शालीत गुंडाळ आणि मग मासे मारत बैस". या घटनेची ऊब पुलकित शालीच्या उबेपेक्षा अधिक होती.

---

कृती १ आकलन कृती ः

१) आकृतिबंध पूर्ण करा. (०१)

१.लेखकांना शाल देणारे → [ ]
→ [ ]

२) पु.ल. व सुनीताबाई यांनी लेखकांना दिलेली शाल (०१)

↙ लेखकांनी ठेवली → [ ]
↘ शाल वापरली → [ ]

Scanned by CamScanner

कृती २ आकलनकृती :

१) कारण लिहा. (०१)

१. बाळ थंडीने कुडकुडत रडत असतानाही आई तिकडे बघतही नव्हती कारण..................................

२) नावे लिहा. (०१)

१. लेखक विश्वकोशाचा अध्यक्ष म्हणून गेले ते ठिकाण : [ ]

२. लेखक या शाळेत राहत होते : [ ]

कृती ३ अ व्याकरण कृती :

१) पुढील शब्दांचे समानार्थी शब्द उता-यातून शोधून लिहा. (०१)

१. सरिता २. स्त्री

२) खालील वाक्यातील अधोरेखित केलेल्या शब्दांची जात ओळखा. (०१)

१. मी एका <u>पायावर</u> हो म्हटले.

कृती ४ स्वमत (०२)

'शाल व शालीनता' यांचा पाठाच्या आधारे तुम्हाला कळलेला अर्थ स्पष्ट करा.

प्र. २ काव्यसौंदय कृती (०४)

१. 'दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दुःखात गेले' या ओळीतील विचारसौंदर्य स्पष्ट करा.

---

प्र. ३ व्याकरण कृती (०२)

१. कंसातील सूचनेनुसार वाक्यांचे प्रकार बदला.

१) विमान प्रवास सगळयांना आवडतो. (प्रश्नार्थी करा)

२) केवढी उंच इमरत ही ! (विधानार्थी करा)

२. खालील वाक्ये लेखन नियमानुसार शुद्ध करून लिहा. (०२)

१) साखरेत मीठाई घालुन आणली होती.

२) मिनीटभर माझा वीश्वासच बसेना.

Scanned by CamScanner

प्र.४ खालील निवेदन वाचून त्याखालील कृतीनुसार पत्राचा नमुना तयार करा. (०४)

‘झाडे लावा.....झाडे जगवा’
हिरवाई ट्रस्ट , तळेगाव दाभाडे
जागतिक पर्यावरण दिनानिमित्त

| दिनांक ५ जून | रोपांचे मोफत वाटप |
|---|---|

संपर्क : हिरवाई ट्रस्ट, बालोदयान मार्ग, तळेगाव, दाभाडे.

विदयार्थी प्रतिनिधी या नात्याने

↓

शाळेत वृक्षारोपण करण्यासाठी रोपांची मागणी करणारे पत्र लिहा.

**किंवा**

खालील जाहिरात वाचा व त्याखालील कृती सोडवा.

आरोग्यम् धनसम्पदा

काळके शक्ती व्यायामशाळा

प्रो. विशाल वाळके यांची व्यायामशाळा
योगसने व व्यायाम हीच आरोग्याची गुरूकिल्ली

वेळ : सकाळी ५ ते १०
सायं : ५ ते ९

**आमची वैशिष्टये :**

- वातानुकूलित प्रशस्त जागा
- सोईस्कर वेळा
- आधुनिक सामग्री
- तज्ज्ञ प्रशिक्षक

संपर्क पत्ता : वाळके शक्ती व्यायामशाळा, ‘प्राजक्त’ हिलटॉप रोड,
अमरावती -१४.

Scanned by CamScanner

कृती सोडवा.

१. व्यायामशाळेचे व्यवस्थापक → [ ] (०१)

२. व्यायामशाळेच्या ब्रीदवाक्याचा अर्थ (०१)

↓

[ ]

३. व्यायामशाळेची वैशिष्टये (०२)

↓ [ ] [ ] [ ] [ ]

......

Scanned by CamScanner